३६३

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/२५६/२०१९
दिनांक : ०४/०२/२०१९.

# "जाहिर नोटीस"

**( झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना )**

१. ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे.) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये महाराष्ट्र शासनाने, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१ दि.३०/०६/२००५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली आहे;

२. आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे;

३. आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुनर्वसनाचा प्रस्ताव मे. सम्यक गृहनिर्माण प्रा. लि. यांनी दाखल केलेला आहे. प्रस्तावाच्या अनुषंगाने तत्कालीन उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी सि.स.नं.११२, गणेश पेठ, पुणे या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची प्राथमिक पात्रता यादी दि.१७/०२/२०११ रोजी निश्चित केलेली आहे. तसेच तत्कालीन उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी दि.०६/०१/२०११ रोजी झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी निश्चित केली आहे. उपरोक्त जमिनीवर एकूण ३१ झोपडीधारक असून त्यापैकी पात्र निवासी २३, पात्र बिगरनिवासी ०० असे एकुण २३ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी १८ झोपडीधारकांनी (७८.१८%) मे. सम्यक गृहनिर्माण प्रा. लि. यांना पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली आहे;

४. आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी क्षेत्र अघोषित असलेने क्षेत्रिय अधिकारी, भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांचेकडील झोपडपट्टी सदृश्य परिस्थितीचा अहवालानुसार "सदर मिळकतीच्या पाहणीअंती जागेवर झोपडपट्टी सदृश्य परिस्थितीत आढळून येते." असे नमुद केले आहे. तसा अहवाल त्यांनी दि.१४/०७/२०११ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

**५. आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन आणि पुनर्विकास) अधिनियम (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिध्द झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी,कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो, व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबददल त्याची खात्री पटल्यावर, कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे,किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियमित केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी**

दिल्यानंतर, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे आणि त्यांनतर ४५ दिवसाच्या आंत अशी जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील ", असे नमूद केले आहे ;

६. आणि ज्याअर्थी, या नोटीसव्दारे सोबत अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ क नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित आहे;

७. त्या अर्थी, या अनुसुचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती / संस्था यांना, त्यांच्या ज्या काही सूचना / हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत सादर करण्यास फर्माविण्यात येत आहे. अशा सुचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल;

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा | विकसकाचे नाव व संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|
| सि.स.नं.११२, गणेश पेठ, पुणे | ३४०.१९ चौ. मी. | **पुर्वेस** - शेख हॉस्पिटल<br>**पश्चिमेस** - न.भु.क्र.६५, ६२, ६६, ६७<br>**उत्तरेस** - न.भु.क्र.१११<br>**दक्षिणेस** - न.भु.क्र.१२५ | मे. सम्यक गृहनिर्माण प्रा. लि. २४ 'संकल्प' आपटेरोड शिवाजीनगर पुणे ०४. |

सदरची नोटिस ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

**(पांडूरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक - ०४ / ०२ /२०१९

प्रत :- १) मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
२) मे. सम्यक गृहनिर्माण प्रा. लि., २४ 'संकल्प' आपटेरोड शिवाजीनगर पुणे ०४.
३) व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६